आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १,०५ वाजता
६ एप्रिल २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी

- देशभरात आज रामनवमीचा उत्साह, अयोध्येत राममंदिरात विशेष किरणोत्सव

- तामिळनाडूमध्ये रामेश्वरम इथल्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार

**आणि**

- जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत भारताच्या हितेश गुलिया याने पटकावलं सुवर्णपदक

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. गेल्या आठवड्यात लोकसभेत २८८ विरुद्ध २३२ मतांनी तर राज्यसभेत १२८ विरुद्ध ९५ मतांनी हे विधेयक मंजूर झालं होतं. वक्फ मालमत्ता व्यवस्थापनात असलेला पारदर्शकतेचा अभाव या नव्या कायद्यामुळे दूर होणार आहे. वक्फच्या नोंदींचं डिजिटायजेशन करणं, वक्फ मालमत्तांचं ऑडिट करणं, मालमत्तेचं सर्वेक्षण पूर्ण करणं हा या विधेयकाचा हेतू आहे. नव्या सुधारणेनुसार वक्फ बोर्डात मुस्लिम समुदायातल्या मागास घटकांना आणि महिलांना प्रतिनिधीत्व दिलं जाईल. तसंच केंद्रीकृत पोर्टलद्वारे वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन केलं जाईल.

**<><><><><>**

आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतल्या राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या

राममंदिरांमध्ये दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा साजरा झाला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत भाविक येत आहेत. देशभरात ठिकठिकाणी भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रादेखील काढल्या जात आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमी आपल्याला धर्म, न्याय आणि कर्तव्य भावनेची जाणीव करून देते असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर भगवान श्रीरामांचे आशीर्वाद आपल्या सर्वांवर राहावेत आणि आपल्याला मार्गदर्शन करत राहोत, अशी इच्छा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान राम हे केवळ एक पूजनीय देवता नाहीत, तर एक राष्ट्रीय प्रतीक असून प्रभू श्रीराम यांनी उपदेश केलेल्या मूल्यांचं पालन आणि जतन केलं पाहिजे, असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही रामनवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांच्या आदर्शमय जीवनातून प्रेरणा घेऊन समाजात सौहार्द, सहिष्णुता आणि सत्याची मूल्यं अधिक बळकट करावीत असं आवाहन पवार यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समर्थ रामदास यांच्या मनाच्या श्लोकातला 'दीनानाथ हा राम कोदंडधारी, पुढे देखतां काळ पोटी थरारी' हा श्लोक उद्धृत करत सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

अयोध्येतल्या राम मंदिरात आज दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. रामलल्लाच्या कपाळावर सूर्याच्या किरणांनी तिलक लावल्यानंतर श्रीरामांना छपन्न भोग अर्थात नैवेद्य दाखवण्यात आला.

रामजन्मोत्सवानिमित्त जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. याशिवाय आज संध्याकाळी मंदिरात दीपोत्सव साजरा केला जाणार आहे.

महाराष्ट्रात मुंबईमध्ये वडाळा इथल्या राममंदिरात सजावट करण्यात आली असून सकाळपासून भाविकांनी श्रीरामाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत. तसंच, नागपूरमधलं पोद्दारेश्वर राम मंदिर, नाशिक मधलं काळाराम मंदिर, हिंगोली शहरातलं संकट मोचन हनुमान मंदिर, छत्रपती संभाजीनगर इथल्या राम मंदिरांसह शिर्डी, शेगांव आणि विविध मंदिरांमध्ये फुलांची आकर्षक सजावट तसंच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पोर्तुगाल आणि स्लोव्हाकियाच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. आज रात्री उशिरा त्या पोर्तुगालला पोहोचतील. आपल्या पोर्तुगाल दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू पोर्तुलागच्या राष्ट्रपती मार्सेलो रेबेलो डी सौसा यांची भेट घेऊन शिष्टमंडळ स्तरीय चर्चा करतील. त्या पोर्तुगालचे प्रधानमंत्री लुईस मॉन्टेनेग्रो आणि त्यांच्या राष्ट्रीय संसदेचे अध्यक्ष जोस पेड्रो अगुइर-ब्रँको यांचीही भेट घेणार आहेत.

पोर्तुगालचा दौरा आटोपून स्लोव्हाकियाला पोहोचल्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, स्लोव्हाकीयाचे राष्ट्रपती पीटर पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतील.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या हस्ते आज माहो ओमंथाई रेल्वे प्रकल्पाचं उद्घाटन झालं. यावेळी दोन्ही नेत्यांनी माहो अनुराधापुरा मार्गावर सिग्नल यंत्रणेच्या फलकाचंही अनावरण केलं. हे दोन्ही प्रकल्प भारताच्या पाठबळानं साकारलेले प्रकल्प आहेत. या प्रकल्पांमुळे श्रीलंकेचा

उत्तरेकडचा भाग आणि कोलंबो दरम्यान सुरळीत, सुरक्षित आणि विश्वासार्ह रेल्वे सेवेची सुनिश्चिती होणार आहे.

त्याआधी दोन्ही नेत्यांनी जय श्री महाबोधी मंदिरात जाऊन प्रार्थना केली. प्रधानमंत्री आज आपला श्रीलंकेचा तीन दिवसांचा दौरा आटोपून, तमीळनाडूतल्या मंडपमसाठी रवाना झाले. दरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका भेटीदरम्यान सद्भावनेचं प्रतीक म्हणून श्रीलंकेनं १४ भारतीय मच्छिमारांची सुटका केली आहे.

श्रीलंकेचा दौरा आटोपून तामीळनाडूत पोहोचल्यावर प्रधानमंत्र्यांच्या हस्ते तामिळनाडूमधल्या रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या पंबन रेल्वे पुलाचं उद्घाटन होणार आहे. या सागरी पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, वेल्डिंगच्या सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ८ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण देखील होणार आहे. यावेळी प्रधानमंत्री रामेश्वरम-तांबरम एक्सप्रेसला देखील हिरवा झेंडा दाखवतील, यावेळी ते रामनवमीच्या निमित्तानं रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शनही घेतील.

**<><><><><>**

ब्राझीलमध्ये झालेल्या जागतिक मुष्टीयुद्ध चषक स्पर्धेत आज पुरुषांच्या ७० किलो वजनी गटात भारताच्या हितेश गुलिया यानं सुवर्णपदक पटकावलं. हितेशनं अंतिम सामन्यात इंग्लंडच्या ओडेल कामारा याचा पराभव केला. भारताच्याच अभिनाश जामवालया यानं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. अंतिम फेरीत अभिनाशला ब्राझीलच्या युरी रीसकडून ० - ५ असा पराभव पत्करावा लागला. याआधी काल पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या मनीष राठोड यानं कांस्य पदकाची कमाई केली.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यात हैदराबाद इथं संध्याकाळी साडेसात वाजता सामना होणार आहे. काल चंदीगड इथं झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं पंजाब किंग्जला ५० धावांनी पराभव केला. तत्पूर्वी काल दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्जचा २५ धावांनी पराभव केला.

<><><><><>

तेलंगणात काल वीस महिलांसह ८६ नक्षलवादी पोलिसांना शरण आले. नक्षलग्रस्त भागात शांतता आणि सामान्य जनजीवन प्रस्थापित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमधला हा एक मोठा टप्पा आहे. शरण आलेल्यांच्या पुनर्वसनासाठी तात्काळ मदत म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपये देण्यात आले. या नक्षलवाद्यांनी विशेषतः त्यांच्यातल्या महिलांनी यापुढे शांतता आणि विकासाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतल्याचं तेलंगणाचे पोलीस महासंचालक चंद्रशेखर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. दरम्यान, आंध्र प्रदेशातही ११ माओवादी पोलिसांना शरण आले. त्यांच्या पुनर्वसनासाठी लवकरच मदत दिली जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><><>

म्यानमारमधे झालेल्या भूकंपातला मृतांचा आकडा ३ हजारांवर पोहोचला आहे. तर २००हून अधिक जण अजूनही बेपत्ता आहेत. भूकंपाच्या केंद्राजवळ मंडाले इथं संयुक्त राष्ट्रांचे मदत प्रमुख टॉम फ्लेचर यांनी मानवतावादी आणि सामुदायिक संस्थांच्या मदत कार्यांचे कौतुक केलं. भारत आणि इतर देशांमधली पथकं त्या ठिकाणी मदत करत आहेत. भारताने शनिवारी ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत म्यानमारला अतिरिक्त ४४२ टन अन्नाची मदत पोहोचवली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेनं कालपासून काही देशांकडून १० टक्के इतका कर वसूल करायला सुरुवात केली. ही कर आकारणी काल मध्यरात्रीपासून अमेरिकेतली बंदरं, विमानतळ, सीमा शुल्क गोदामांवर करण्यात येत आहे. या शुल्काची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात अधिकृत आदेश काढून केली होती.

**//<><><><><>//**